**प्रेसनोट** **दिनांक-०६/१०/२०२१**

**हेरॉईन ड्रग्जचा मुंबईत पुरवठा करणारा राजस्थान येथील दोन पुरवठादार इसमांना अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिटने एकुण ५ किलो वजनाचा व अंदाजे १५ करोड रूपये किंमतीच्या ''हेरॉईन'' या अंमली पदार्थासह अटक केले बाबत.**

| | |
|---|---|
| कक्ष | अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिट, गु.शा.गु.अ.वि. मुंबई |
| गु.र.क्र. व कलम | ८८/२०२१, कलम ८(क) सह २१(क), २९ एन्.डी.पी.एस्. ॲक्ट १९८५ . |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक ०४/१०/२०२१ रोजी २०.१० वा. |
| गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक ०४/१०/२०२१ रोजी ०९.३० वा. ते ०९.५५ वाजेच्या दरम्यान |
| फिर्यादीचे नाव | पो.शि.क्र. ०७१४१९/सनी ढाणे, नेमणुक-अं.प.वि.कक्ष, आझाद मैदान युनिट, गु.शा., मुंबई. |
| आरोपीची संख्या | ०२ (दिनांक ०४/१०/२०२१ रोजी अटक) |
| जप्त मुददेमाल व अंदाजे किंमत | एकुण ०५ किलोग्रॅम वजनाचा 'हेरॉईन' हा अंमली पदार्थ (अं किं.रू. १५,००,००,०००/-अक्षरी पंधरा करोड रूपये अंदाजे) |

**थोडक्यात हकिकत :-** मुंबई शहरात हेरॉईन या अंमली पदार्थाचा पुरवठा काही संघटीत टोळयांमार्फत राजस्थान मधील अफुचे मोठया प्रमाणात उत्पादर होणारे प्रतापगड व चित्तोडगड या जिल्यांमधुन रेल्वेमार्गे तसेच बसमार्गे होत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्षास प्राप्त झाली होती. मुंबईत हेरॉईनचा सप्लाय करणारे अशा इसमांचा माग मागील काही दिवसांपासुन काढण्यात येत होता.

त्या अनुषंगाने मिळालेल्या तांत्रिक माहितीचे व गुप्त बातमीदारांकडुन प्राप्त माहितीचे विश्लेषण केले असता मुंबईत हेरॉईन पुरवठा करणाऱ्या राजस्थान येथील पुरवठादारांची नावे निष्पन्न करण्यात आली होती. सदर गुन्हयातील अटक आरोपीत इसम मागील काही दिवसांपासुन मुंबईत असल्याची माहिती मिळाली होती. दिनांक ०४/१०/२०२१ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष,आझाद मैदान युनिटचे पोलीस निरीक्षक राजेंद दहिफळे यांना त्यांचे विश्वासु बातमीदाराकडुन राजस्थान येथील अटक आरोपी हे डोंगरी मुंबई परीसरात हेरॉईन या अंमली पदार्थाची विक्री करण्यासठी येत असल्याची खबर मिळाली. त्याप्रमाणे विहित कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून डोंगरी मुंबई परीसरात आझाद मैदान युनिटचे पोलीस पथकाने सापळा लावुन राजस्थानचे रहिवाशी असणारा १) इसम नामे हकिम गुल खान ५६ वर्षे रा. अल्वेदी जि.प्रतापगड, राजस्थान यास ४.५ किलोग्रॅम व २) इसम जीवनलाल भेरूलाल मिणा वय २१ वर्षे यास ५०० ग्रॅम हिरॉईन असे दोघांकडुन **एकुण ५ किलोग्रॅम हेरॉईन (किंमत अंदाजे १५,००,००,००० रूपये)** हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. आरोपींचे विरोधात अं.प.वि. कक्ष, गु.र.क्र. ८८/२०२१, कलम ८ (क)सह २१(क), २९ एन्.डी.पी.एस्.ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करुन नमूद आरोपीस दिनांक ०४/१०/२०२१ रोजी गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीकडे केलेल्या चौकशीमध्ये मुंबई शहरातील ज्या डीलर्सला ते अंमली पदार्थ पुरवठा करत होते त्यांची नावे पुढे आली असुन त्यांचेवर कारवाई करीत आहोत. तसेच या गुन्हयाचे

Scanned with CamScanner

अनुषंगाने अंमली पदार्थांचे तस्करीत सहभागी असणारे इतर आरोपींचा शोध सुरू आहे.गुन्हयातील जप्त अंमली पदार्थाचा मुख्य पुरवठादार आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

बृहन्मुंबई शहर पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखेचे सर्व युनिट, सर्व पोलीस ठाणे यांचे मार्फतीने सतत मोठया प्रमाणात आणि प्रभावीपणे अंमली पदार्थांची विक्री, तस्करी, वाहतुक, सेवन करणारे इसमांवर कारवाई केली जाते. जानेवारी २०२१ पासुन आतापर्यंत मुंबई शहरातील सर्व पोलीस ठाणे तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्ष गुन्हे शाखा यांनी मोठया प्रमाणात केलेल्या कारवाईचा थोडक्यात तपशिल पुढिल प्रमाणे.

| | दाखल गुन्हे संख्या | अटक आरोपींची संख्या | जप्त अंमली पदार्थ कि.ग्रॅ मध्ये | जप्त अं.प.किंमत कोटी मध्ये |
|---|---|---|---|---|
| अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा मुंबई | ८८ | १२९ | २५६९ कि.ग्रॅ | ६०.१६ कोटी रूपये |
| पोलीस ठाणे स्तरावरील कारवाई | ३२४५ | ३४४६ | १२४३ कि.ग्रॅ | २६.३४ कोटी रूपये |
| | **३३३३** | **३५७५** | **३८१२ कि.ग्रॅ** | **८६.५० कोटी रू. अंदाजे.** |

अशा प्रकारे 'अंमली पदार्थमुक्त समाज' बनविण्याचे दृष्टिने बृहन्मुंबई शहर पोलीस आयुक्तालय सतत प्रयत्नशील आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस सह आयुक्त(गुन्हे),श्री. मिलिंद भारंबे सो, मा.अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री विरेश प्रभु सो, मा. पोलीस उप आयुक्त,श्री.दत्ता नलावडे सो व मा. सहा. पोलीस आयुक्त, पो.नि.श्री. संदीप काळे सो (अतिरीक्त कार्यभार), अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिटचे प्रभारी पोलीस निरीक्षक राजेंद्र दहिफळे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि सिध्दराम म्हेत्रे, पोउनि मानसिंग काळे, पोउनि अमित देवकर, पो.ह.क्र. २९०६१/मुजावर, पो.ना.क्र. ०५०२११/चव्हाण, पो.शि. क्र.०७१४१९/ढाणे, पो.शि.चा.क्र. ०७०२०७/निबांळकर, पो.शि.क्र.०८०७१२/भुजबळ यांनी पार पाडली असून गुन्हयाचा पुढील तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक मानसिंग काळे हे करीत आहेत.

-----०-----

Scanned with CamScanner